|| श्री गणेशाय नमः ||

# हरी ॐ धार्मिक पूजा विधी केंद्र

Astro • Puja • Vastu

ज्योतिष आणि वास्तु सल्लागार

## मनाचे श्लोक

सदा सर्वदा योग तुझा घडावा | तुझे कारणी देह माझा पडावा |
उपेक्षु नको गुणवंता अनंता | रघुनायका मागणे हेचि आतां ||१||

कैलासराणा शिव चंद्रमौळी । फणींद्र माथा मुकुटीं झळाळी ।
कारुण्यसिंधू भवदुःखहारी । तुजवीण शंभो मज कोण तारी |

प्रारंभी विनंती करू गणपती, विद्यादया सागरा अज्ञानत्व हरोनी बुद्धी मती दे,
आराध्य मोरेश्वरा चिंता क्लेश दरिद्र दुःख अवघे, देशांतरा पाठवू
हेरंबा गणनायका गजमुखा, भक्ता बहू तोषवी ||

मोरया मोरया मी बाळ तान्हे तुझीच सेवा करू काय जाणे
अन्याय माझे कोट्यानुकोटी मोरेश्वरा बा तू घाल पोटी

मोरया मोरया असे नाव तुझे कृपासागर हेचि माहेर माझे
तुझी सोंड हि वाकडी असे एकदंता मला बुद्धी दे चांगली ज्ञानवंता

नेत्री दोन हिरे प्रकाश पसरे, अत्यंत ते साजिरे माथा शेंदूर पाझरे वरी वरे, दुर्वांकुरांचे तुरे
माझे चित्त विरे मनोरथ पुरे, देखोनि चिंता हरे गोसावीसुत वासुदेव कवी रे, त्या मोरयाला स्मरे ||

गणपती तुझे नांव चांगले आवडे बहु चित्त रंगले
प्रार्थना तुझी गौरी नंदना हे दयानिधे! श्रीगजानना || किंवा आम्हा बुद्धी दे, बुद्धीवंदना ||

कैलासराणा शिव चंद्रमौळी । फणींद्र माथा मुकुटीं झळाळी ।
कारुण्यसिंधू भवदुःखहारी । तुजवीण शंभो मज कोण तारी |

ज्या ज्या ठिकाणी हे मन जाय माझे त्या त्या ठिकाणी निज रूप तुझे मी ठेवितो मस्तक ज्या ठिकाणी
तेथे तुझे सद्गुरू पाय दोन्ही तेथे तुझे सद्गुरू पाय दोन्ही...

उपासनेला दृढ चालवावें भूदेव संताशी सदा नेमावें
सत्कर्म योगे वय घालवावें सर्वामुखी मंगल बोलवावें ।।२।।

अलंकापुरी पुण्य भूमी पवित्र | तिथे नांदतो ज्ञानराजा सुपात्र ||
तया आठविता महापुण्यराशी | नमस्कार माझा सदगुरू ज्ञानेश्वराशी ||६||

माते तुझे ध्यान आम्हावरी राहो तुझे नाम आमच्या मुखाशी येवो
माते तुझे आम्ही दासानुदास नमस्कार करतो माते तूझ्या चरणास

हेंचि दान देगा देवा ।। तुझा विसर न व्हावा ।। १ ।।
गुण गाईन आवडी ।। हेंचि माझी सर्व जोडी ।। २ ।।
न लगे मुक्ती धनसंपदा ।। संतसंग देईं सदा ।। ३ ।।
तुका म्हणे गर्भवासीं।। सुखें घालावें आम्हांसी ।।४।।


HARI OM DHARMIK PUJA VIDHI KENDRA

योगेशशास्त्री ढवळे (गुरुजी) : 95944 28749 | निलेशशास्त्री ढवळे (गुरुजी) : 86524 02078

SANPADA OFFICE
Office No.8, 1st Flr, Shiva Triveni Galleria CHS.,
Plot No. 13, Sector 8, Sanpada, Navi Mumbai

GOVANDI OFFICE
Shri Swaybhu Hanuman Mandir, Deonar
Mahanagarpalika Vasahat, Govandi, Mumbai.

hariom astrologers | hariom astrologers | hariom_astrologers
hariomastrologers@gmail.com | www.hariomastrologers.com